Pune Police

# वार्ता टिपण दि.२९/०३/२०१९

## सिंहगडरोड पोलीस स्टेशनचे हद्दीत पडलेल्या दरोडयातील आरोपीच्या आवळल्या मुसक्या

दि.१२/०३/२०१९ रोजी मध्यरात्रीचे सुमारास ५ ते ७ दरोडेखोरांनी रायकरमळा,धायरी येथील राहणारे बागायतदार शेतकरी श्री विशाल बाळु पोकळे यांचे घराचा दरवाज्या तोडुन आतप्रवेश करुन विशाल पोकळे यांचे वयोवृध्द आई,वडील,बायको यांचे हातपाय दोरीने बांधुन, काठीने, व लाथा-बुक्याने मारहाण करुन दहशत बसवुन घरातील सोन्या चांदीचे दागीने,रोख रक्कम,मोबाईलसह नवीन मोटार-सायकल जबरदस्तीने दरोडा टाकुन चोरुन घेवुन गेले होते. त्याबाबत विशाल पोकळे यांची पत्नी सौ.निता यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिंहगडरोड पोस्टे पुणे येथे गु.र.नं.२१६/२०१९ भादंविक ३९५,५०६(२),महाराष्ट्र पोलीस का.क. ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा घडलेपासुन, सदर गुन्ह्यातील आरोपींचा शोध खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री रघुनाथ जाधव व त्यांचे अधिकारी व कर्मचारी हे वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे करीत होते.

गुप्तबातमीदारामार्फत बातमी मिळाली की, गेले अनेक वर्षापासुन फिर्यादी यांची चिचेंची झाडे घेण्यासाठी येत असलेला सोमनाथ विठ्ठल माने रा.धायरी,पुणे याने त्याचे साथीदारा बरोबर सदरचा दरोडा घातला आहे अशी माहिती मिळाल्याने, खंडणी विरोधी पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांनी प्रथम (१) सोमनाथ विठ्ठल माने यास धायरी गावातुन ताब्यात घेवुन, त्यांचेकडे सखोल तपास करता त्यांने स्वतः व इतर ४ ते ५ साथीदारांचे मदतीने सदरचा दरोडा घातल्याचे कबुल केल्याने त्यांचे साथीदार नामे (२) प्रविण विलास दोडमिसे वय २५ वर्ष रा.भुगाव, सांगबर्ड कंपनी लेबर कॅम्प पुणे मुळ हराळवाडी, ता.मोहोळ,जि.सोलापुर (३) सागर निलाप्पा गायकवाड वय २३ वर्ष रा.सदर (४) संभाजी सिताराम गोरे ऊर्फ शंभु वय ३० वर्ष रा.परांजपे कंपनीजवळ न-हे गाव धायरी पुणे मुळ पत्ता -नवा मोहडा पेट्रोलपंपाजवळ, खोबरागडीनगर,गल्ली नंबर १, नांदेड यांना पकडले. (५) पाहिजे आरोपी नामे अशोक उर्फ बाबुराव ऊर्फ काका नागा गायकवाड रा.निजामाबाद हैद्राबाद हा मिळाला नाही. पकडलेल्या आरोपींकडे चौकशी करता त्यांनी,आंम्ही सर्वांनी मिळुन गुन्हा केल्याचे फिर्यादी,त्यांचे आई-वडील यांचे हातपाय बांधनु मारहाण केल्याचे कबुल करुन सोने –चांदीचे दागीने,मोटार-सायकल,मोबाईल व इतर वस्तु जबरदस्तीने चोरुन नेल्याचे सांगीतले. आरोपींना पुढील तपासकामी सिंहगडरोड पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.सदरचे आरोपी हे रेकॉर्ड वरील अट्टल गुन्हेगार आहेत.

वर नमुद आरोपी यांचेकडुन कमरेचा छल्ला,लक्ष्मीहार,मनीमंगळसुत्र, कानातील झुमके, दोन बांगडया,एक रॅडो कंपनीचे घडयाळ,चांदीची पट्टी,वॅगनर गाडीची चावी, दोन मोबाईल फोन फोडलेल्या अवस्थेतील,मोटार सायकलच्या दोन नंबर प्लेट,व एक तलवार असा एकुण १,१५,०००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही गुन्हें शाखेचे अपर पोलीस आयुक्त मा.श्री.प्रदिप देशपांडे सो. पोलीस उपायुक्त मा.श्री.शिरीष सरदेशपांडे सो. सहा.पोलीस आयुक्त गुन्हे -१ पुणे मा.श्री.समीर शेख सो.यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक पश्चिम विभागाचे पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव,पोलीस उपनिरीक्षक निखील पवार, आनंद रावडे पोलीस कर्मचारी नामे अविनाश मराठे, भाऊसो.कोंढरे, प्रदिप शिंदे, रमेश गरुड,प्रमोद मगर,प्रकाश मगर, हनुमंत गायकवाड, एकनाथ कंधारे, संतोष मते, उदय काळभोर, मनोज शिंदे, महेश कदम, पांडुरंग वांजळे, विजय गुरव, सुनिल चिखले, संजय काळोखे, धिरज भोर, फिरोज बागवान, शिवानंद बोले, सचिन कोकरे, मंगेश पवार, अमोल पिलाने, प्रविण पडवळ, नारायण बनकर यांनी केली आहे.

